नि. ८०

रजि. ए/डी/दस्ती/चिटकविणे/ढोल वाजवणे आणि प्रकाशन/डीआरटीचा सूचना फलक

## विक्री उद्‌घोषणा

**वसुली अधिकारी यांचे कार्यालय कर्ज वसुली न्यायाधिकरण–II, मुंबई**

एमटीएनएल भवन, ३रा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई.

**आर.पी. क्र. ८२/२०१३** **दिनांक: १४.१०.२०२५**

**रिकव्हरी ऑफ डेब्टस् ड्यू टु बँक अँण्ड फायनान्शियल इन्स्टिट्युशन अ‍ॅक्ट, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ३८, ५२(२) अन्वये विक्रीची उद्‌घोषणा**

**१. युनियन बँक ऑफ इंडिया, प्रिन्सेस स्ट्रीट शाखा**
**२. आर्सिल (लक्ष्मी विलास बँक लि.), फोर्ट शाखा** **...प्रमाणपत्र धारक**

**विरुध्द**

**मे. श्रीमाऊली इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड** **... प्रमाणपत्र कर्जदार**

**सी.डी.१: मे. श्रीमाऊली इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, ५०७, डी विंग, कुमार बिझनेस कोर्ट, मुकुंद नगर, पुणे ४११०३७. तसेच ब्लॉक क्रमांक ११, ७०२/७०३, सातवा मजला, लॉयड्स चेंबर्स, मंगळवार पेठ, माळधक्का चौक, पुणे ११. तसेच ५०२, हिमालय हाऊस, हज हाऊसजवळ, फलटण रोड, मुंबई ४००००१**

**सी.डी.२: श्री. कट्टमरेड्डी पत्ताभिराम रेड्डी, बंगला क्रमांक २, ला व्हिला, ''कोनार्क स्प्लेंडर'', स.क्र. ३७/७१–बी, वडगाव शेजारी, कल्याणी नगर, पुणे ४११०३७.**

**सी.डी.३: सौ. कमाक्षी के. रेड्डी, बंगला क्रमांक २, ला व्हिला, ''कोनार्क स्प्लेंडर'', स.क्र. ३७/७१–बी, वडगाव शेजारी, कल्याणी नगर, पुणे ४११०३७.**

ज्याअर्थी, नामदार पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II, मुंबई यांनी प्रमाणपत्र कर्जदारांकडून व्याज आणि खर्चासह **रु. ४७,५६,५३,०१२.५९** च्या वसुलीसाठी मूळ अर्ज **क्र. १०३/२०१२** मध्ये वसुली प्रमाणपत्र काढले आणि वसुली प्रमाणपत्र/हुकूमाप्रमाणे **रु. १०८,२८,४१,२७९ पै. (२१.०७.२०२५ पर्यंत)** ची रक्कम पुढील व्याज आणि आकार यासह एकत्रितपणे वसुलीयोग्य आहे.

आणि ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विकण्याचे आदेश दिले.

आणि ज्याअर्थी, **प्र. क. कडून रु. ४७,५६,५३,०१२.५९ पै. सह दंड आणि वसुली आणि/किंवा प्रदानापर्यंत अर्ज दाखल झाल्याच्या तारखेपासून म्हणजेच द.सा. १२% दराने पुढील व्याजाची रक्कम थकीत आहे.**

याद्वारे सूचना देण्यात येते की, जर पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश नसल्यास, सदर मिळकत **०९.१२.२०२५ रोजी दु. २.०० ते दु. ३.००** (आवश्यकता असल्यास समाप्तीपूर्वी शेवटच्या ५ मिनिटात बोली केली गेल्यास आपोआप विस्तारासह) दरम्यान **खुल्या जाहीर ई–लिलावाने विकली जाईल आणि बोली मे. सी–१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,** ज्यांचा पत्ता **प्लॉट क्र. ६८, सेक्टर ४४, गुरुग्राम–१२२००३, हरयाना, भारत यांची वेबसाईट (www.bankeauctions.com) मार्फत ''ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बोली'' ने करण्यात येईल. संपर्क व्यक्ती : श्री. भाविक पांड्या (मोबाईल +९१ ८८६६६८२९३७), ईमेल पत्ता– maharashtra@c1india.com आणि gujarat@c1india.com. (सपोर्ट हेल्पडेक्स क्र. +९१ ८८६६६८२९३७/०१२४४३०२०००). इच्छुक बोलीदारांनी पुरेशा आधी वरील सदर ई–लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर स्वत:ची नोंदणी करणे आणि आवश्यक दस्तावेज अपलोड करण्याकरिता आणि खुल्या ई–लिलावात सहभागी होण्याकरिता युजर आयडी आणि पासवर्ड मिळविणे आवश्यक आहे.**

**पुढील तपशिलाकरिता संपर्क: श्री. किशोर चंद्र कुमार, मोबाईल क्रमांक ९४६६७४७८९४.**

खालील परिशिष्टात वर्णन केल्याप्रमाणे उपरिनामित प्रतिवादी यांच्या मिळकतीची विक्री आणि सदर मिळकतीशी निगडित दायित्वे आणि दावे, जो पर्यंत ते सुनिश्चित केले आहेत, ते प्रत्येक संचासमोर परिशिष्टांत विनिर्दिष्ट केले आहेत.

परिशिष्टांत विनिर्दिष्ट केलेल्या संचांमधील विक्रीसाठी मिळकत ठेवली जाईल. जर, मिळकतीच्या एखाद्या हिश्श्याच्या विक्रीतून रोकड झालेल्या रकमेतून देणे भागले तर, उर्वरित बाबतीत विक्री ताबडतोब थांबवली जाईल. जर, विक्री घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सदर प्रमाणपत्रातील थकबाकी, व्याज, खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणत्याही संचाच्या विक्रीआधी जमा केली किंवा त्यांना पटेल असे प्रमाणपत्रातील रक्कम, व्याज व खर्च निम्नस्वाक्षरीकारांकडे प्रदान केल्याचे पुरावे सादर केले तर ती विक्री देखील थांबविण्यात येईल.

विक्रीशी संबंधित कोणतीही कृती करणारे कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे विकावयाच्या मिळकतीसाठी बोली, संपादन किंवा कोणतेही हितसंबंध संपादित करू शकणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टात विहित अटी आणि त्याअंतर्गतचे नियम आणि खालील शर्तींच्या अधीन होईल.

१. ज्या खाली मिळकत विकली जाणार नाही ती राखीव किंमत **रु.४१,२८,०००/– (रुपये एकेचाळीस लाख अठ्ठावीस हजार मात्र)**
२. ज्या रकमेने बोली वाढवायची ती **रु. ५०,०००/– (रुपये पन्नास हजार मात्र)**. तथापी सदर संदर्भातील निम्नस्वाक्षरीकारांचा निर्णय अंतिम आणि संबंधित पक्षकारांवर बंधनकारक राहील. बोलीच्या रकमेवरून किंवा बोलीदारांवरून कोणताही वाद झाला तर संच पुन्हा विक्रीस ठेवला जाईल.
३. संबंधित संचाचे सर्वोच्च बोलीदारांना खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. हे सर्वस्वी निम्नस्वाक्षरीकारांच्या मर्जीवर अवलंबून असेल की, जेव्हा सरळ सरळ दिसते आहे की, देऊ केलेली किंमत अपुरी आहे तेव्हा ती करणे अव्यवहार्य आहे अशा वेळी सर्वोच्च बोली नाकारायची/स्वीकारायची. जोडलेल्या परिशिष्टांतील विनिर्दिष्ट तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहितीप्रमाणे दिले आहेत, परंतु ह्या उद्‌घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, गैर–विधाने किंवा उणिवांसाठी निम्नस्वाक्षरीकार उत्तर देण्यास बांधील नसतील.
४. तमाम जनतेकडून सदर ई–लिलावासाठी बोली मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन प्रस्तावासह **रु. ४,१३,०००/– (रुपये चार लाख तेरा हजार मात्र) ची इअर रक्कम खाते क्र. ३१७९०१०११०१४९१८, युनियन बँक ऑफ इंडिया, आयएफएससी कोड क्र. UBIN0553352, खाते**मध्ये आरटीजीएस/एनईएफटी मार्फत देय आहे.
   पॅन/टॅन कार्ड, पत्त्याचा पुरावा, बोलीदारांच्या ओळखीच्या पुराव्याच्या स्वसाक्षांकीत प्रतींसह ईमेल आयडी, मोबाईल नंबर, इ. सह बोलीदारांचा संपूर्ण तपशिल आणि **रु. ४,१३,०००/– (रुपये चार लाख तेरा हजार मात्र)** च्या इअर रकमेकरिता आरटीजीएस/एनईएफटी तपशिल देवुन रितसर भरलेले आणि निळ्या शाईने सही केलेले विहित बोली प्रपत्र समाविष्ट मोहोरबंद लिफाफा फक्त **आर.पी. क्र. ८२ सन २०१३** एसे ठळकपणे लिहुन वसुली अधिकारी, डीआरटी–II मुंबई यांच्या नावे मधील प्रस्ताव **०४.१२.२०२५ रोजी सायं. ४.०० पर्यंत** निम्नस्वाक्षरीकारांकडे जमा करणे आवश्यक आहे.
५. बोलीदार स्वत:च्या वतीने किंवा त्यांच्या मुख्यांच्या वतीने बोली लावत असतील तर, त्यांची प्राधिकृती जमा केली पाहिजे, नंतरच्या बाबतीत त्यांनी मुख्याद्वारे रितसर स्वसाक्षांकीत सदर मुख्यांच्या संपूर्ण केवायसी सह एकत्रित त्यांच्या मुख्यांद्वारे रितसर शाईने सही केले मूळ प्राधिकारपत्र बोली दस्तावेजांसह जमा करणे आवश्यक आहे. कंपनीच्या बाबतीत कंपनीच्या मंडळ सदस्यांनी पारित केलेल्या ठरावाची प्रत किंवा सदर मुख्य कंपनीच्या संपूर्ण केवायसी सह प्रतिनिधीत्व/मुखत्यारपणाची पुष्टी करणारा अन्य दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे. कसुर केल्यास बोली विचारात घेतली जाणार नाही.
६. बोलीदारांनी येथील वरील **परिच्छेद ४ आणि ५** मध्ये नमुद नुसार दस्तावेजांच्या छायाप्रतींसह रितसर भरलेल्या विहित प्रपत्राची प्रत वरील सदर लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर स्वत:ची नोंदणी केल्यावर वरील सदर लिलाव एजन्सीच्या वेबसाईटवर ऑनलाईन अपलोड करणे सुध्दा एावश्यक आहे. ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे **०४.१२.२०२५ रोजी सायं. ४.०० पर्यंत.**
   मिळकतींचे प्रत्यक्ष निरीक्षण मिळकतीच्या ठिकाणी **०२.१२.२०२५** रोजी स. १०.०० ते सायं. ५.०० मध्ये करता येईल.
   **पुढील तपशिलाकरिता संपर्क: श्री. किशोर चंद्र कुमार, मोबाईल क्रमांक ९४६६७४७८९४.**
७. एकदा बोली सादर केल्यावर ई–लिलाव एजन्सी पोर्टलवर लॉगईन करुन ई–लिलावाच्या बोली प्रक्रियेमध्ये सहभागी होणे बोलीदारांसाठी आवश्यक आहे, कसूर केल्यास इअर निम्नस्वाक्षरीकारांना योग्य वाटल्यास शासनाकडे जप्त करण्यात येईल.
८. यशस्वी बोलीदारांना इ.अ.र. समायोजित करून त्यांच्या **अंतिम बोली रकमेची २५% रक्कम पुढील कामकाजाच्या दिवशी म्हणजेच सं. ४.००** पर्यंत वरील **परि.–४** प्रमाणे सदर खात्यात भरावी लागेल.
९. यशस्वी उच्चतम बोलीदाराने **अंतिम बोली रकमेची ७५% उर्वरित रक्कम** मिळकतीच्या लिलाव विक्रीच्या तारखेपासून **१५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी, जर १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस असेल तर १५ व्या दिवसानंतर पहिल्या कार्यालयीन कामाच्या दिवशी वरील परिच्छेद ४** मध्ये दिलेल्या पद्धतीने प्रदान करावी.
१०. वरील व्यतिरिक्त, यशस्वी उच्चतम बोलीदारांना मिळकतीच्या लिलाव विक्रीच्या तारखेपासुन **१५ दिवसात रजिस्ट्रार, डीआरटी–II, मुंबईच्या** नावातील डीडीमार्फत **रु. १,०००/–** च्या रकमेपेक्षा जास्त **१% दराने व रु. १,०००/– पर्यंत २% दराने** वसुली अधिकारी–II, डीआरटी–II यांच्याकडे पाऊंडेज फी देखील जमा करावी लागेल.
११. विहित मुदतीत प्रदानात कसूर केल्यास, विक्री खर्च बाजूला केल्यावर जमा रक्कम निम्नस्वाक्षरीकारांना वाटल्यास सरकारकडे जप्त केली जाईल आणि कसूरदार खरेदीदारांना मिळकतीमधील किंवा नंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यातील कोणत्याही हिश्श्यामधील दावे त्यागावे लागतील. विक्रीची नव्याने उद्‌घोषणा जारी करून मिळकतीची पुनर्विक्री केली जाईल. पुढे खरेदीदाराने अंतिम बोली किंमत आणि त्यानंतर विकली जाईल ती किंमत यामध्ये फरक असल्यास तो भरुन देणे बंधनकारक आहे.
१२. मिळकत **''जसे आहे जेथे आहे तत्त्वाने आणि जे आहे जसे आहे तत्त्वाने''** विकली जाईल.
१३. कोणतेही कारण न देता अवास्तव वाटलेल्या सर्व किंवा कोणत्याही बोली स्वीकारणे किंवा फेटाळणे किंवा कोणत्याही समयी लिलाव पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षकारांनी राखून ठेवलेले आहेत.

**परिशिष्ट**

| संच क्र. | जेथे मिळकत कसूरवार व्यक्तीच्या मालकीची असेल तेथे सह–मालकांच्या व सह–मालक म्हणून अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावांसह विकावयाच्या मिळकतीचे वर्णन | मिळकत किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्यावर निर्धारित महसूल | मिळकत ज्यास बांधील आहे अशा अन्य कोणत्याही भारांचे तपशील | मिळकतीवर करण्यात आलेले कोणतेही दावे आणि त्यांच्या स्वरुप व मूल्याबाबत अन्य कोणतेही ज्ञात तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | मौजे वशाळे, तालुका शाहापूर, नोंदणी जिल्हा व उपनोंदणी जिल्हा ठाणे यांच्या हद्दीत असलेली गट क्रमांक ५०२ ही कृषी जमीन, मोजमापित १–६९–०(एच.आर) समतुल्य (१,८१,९०४) चौ.फुट आहे. | उपलब्ध नाही | गहाण मिळकत | उपलब्ध नाही |

माझ्या हस्ते आणि शिक्क्याने सदर **१४ ऑक्टोबर, २०२५** रोजी दिले.

शिक्का

सही/–
**एस. के. शर्मा**
**वसुली अधिकारी,**
**डीआरटी–II, मुंबई**

## जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येत आहे की, आम्ही खालील व्यक्तींच्या मालकी हक्काची तपासणी करत आहोत **(१) हर्षद जगदीश दासवानी, (२) जगदीश ताराचंद दासवानी, आणि (३) विना जगदीश दासवानी,** (यानंतर एकत्रितपणे ''**मालक**'' असे संबोधले जाते), हे सर्व भारतीय रहिवासी असून ४–अ/ब, मोनोलिथ अपार्टमेंट्स, ७, नॅपीअन सी रोड, मुंबई–४०००२६ येथे राहतात. सदर मालकांना ज्यावर मालकी हक्क आहे अशी खाली नमूद केलेली मालमत्ता (यानंतर ''सदर मालमत्ता'' म्हणून ओळखली जाते) आम्ही तपासत आहोत.

कोणत्याही व्यक्ती, वित्तीय संस्था, सोसायटी, फर्म, वैधानिक प्राधिकरण, संस्था (कॉर्पोरेट अथवा इतर), ज्यांना सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागात कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, इस्टेट, स्वारस्य, दावा किंवा मागणी आहे किंवा असल्याचा दावा करतात, त्यांनी विक्री, मालकी, हस्तांतरण, हस्तांतरण करार, विनिमय, गहाण, भार, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, लीज, उपलीज, परवाना, भेट, ट्रस्ट, देखभाल, उत्तराधिकार, कौटुंबिक करार, इझमेंट, हक्कमार्ग, हक्कपत्र, आदेश, न्यायालयीन डिक्री/निर्णय, करार, समझोता, नोटीस, विकास हक्क, सेटलमेंट किंवा कोणत्याही स्वरूपातील अन्य दावे यांद्वारे, त्यांच्या अधिकारांचा पुरावा दर्शवणारी नोटराइज्ड कागदपत्रे सादर करून, या जाहीर सूचनेच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात अधोरेखित वकिलांकडे सादर करावी. निर्दिष्ट कालावधीत कोणताही दावा, हरकत, हक्क, शीर्षक, वाद किंवा मागणी प्राप्त न झाल्यास, ते सर्व दावे रद्द/त्याग केलेले व अमान्य समजले जातील.

**वरील संदर्भातील मालमत्तेचे परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

पाच (५) पूर्णपणे भरलेले इक्विटी शेअर्स, प्रत्येकी रु. ५० (भारतीय रुपये पन्नास फक्त), डिस्टिंक्टिव्ह क्रमांक १११/४६६ ते ११५/४७० (दोन्ही समाविष्ट), शेअर सर्टिफिकेट क्र. ९४ दिनांक १५ मे १९७२, जय कफ परेड को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि. च्या भांडवलात जारी केलेले, आणि त्यासोबत फ्लॅट क्र. एफ/३, क्षेत्रफळ ८१० चौ. फूट (बांधकाम क्षेत्रफळ), सहावा मजला, इमारत पाम स्प्रिंग्स, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४००००५ येथे स्थित. सदर इमारत प्लॉट क्र. १०४ (पूर्वी प्लॉट क्र. १५७) ब्लॉक क्र. एफ, सी.एस. क्र. ६१५, कुलाबा विभाग, क्षेत्रफळ अंदाजे २००० चौ. मीटर, मुंबई उपजिल्ह्यातील नोंदणी जिल्ह्यात स्थित आहे.

**दिनांक: २० ऑक्टोबर २०२५**

**मेसर्स देसाई अँण्ड दिवानजी**
**सही/–**
**फरीदा ढोलकावाला**
**भागीदार,**
अ‍ॅडव्होकेटस्, सॉलिसिटरस् आणि नोटरीज्
फोर्ब्स बिल्डिंग, चौथा मजला, चरणजित राय मार्ग,
फोर्ट, मुंबई–४००००१.

## राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणासमोर, मुंबई खंडपीठ–I
## सी.ए. (सीएए)/१७२(एमबी–I)/२०२५
## मधील
## सी.पी. (सीएए)/२०८(एमबी–I)/२०२५

**कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणात;**

**आणि**

**कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या इतर प्रयोज्य तरतुदी सहवाचता कंपनीज (कॉम्प्रोमायझेस, अ‍ॅरेंजमेंटस् अ‍ॅण्ड अ‍ॅमल्गमेशन्स) रुल्स, २०१६ आणि त्या अंतर्गत स्थापित रेग्युलेशन्सच्या प्रकरणात;**

**आणि**

**कोंग्सबर्ग मॅरिटाईम सीएम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''हस्तांतरक कंपनी'') सह कोंग्सबर्ग मॅरिटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''हस्तांतरीती कंपनी'') आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या ('योजना') प्रकरणात.**

कोंग्सबर्ग मॅरिटाईम सीएम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,
... हस्तांतरक कंपनी / पहिली याचिकाकर्ता कंपनी

कोंग्सबर्ग मॅरिटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ... हस्तांतरीती कंपनी / दुसरी याचिकाकर्ता कंपनी

## याचिकेच्या अंतिम सुनावणीची सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, कोंग्सबर्ग मॅरिटाईम सीएम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''हस्तांतरक कंपनी'') आणि कोंग्सबर्ग मॅरिटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (''हस्तांतरिती कंपनी'') आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या ('योजना') मंजुरी आदेशाकरिता कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ आणि इतर प्रयोज्य तरतुदी सहवाचता कंपन्या (तडजोड, व्यवस्था आणि एकत्रिकरण) निम, २०१६ अन्वये संयुक्तपणे एक कंपनी याचिका सादर करण्यात आली होती आणि १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सन्माननीय श्री. महादेवराव कोचे, मेंबर (ज्युडिशियल) आणि सन्माननीय श्री. प्रभात कुमार, मेंबर (टेक्निकल) द्वारे समाविष्टित मुंबई येथील सन्माननीय राष्ट्रीय कंपनी विधी प्राधिकरण (''सन्माननीय प्रधिकरण'')च्या येथील विभागीय खंडपीठाद्वारे दाखल करण्यात आली होती आणि सदर कंपनी याचिका ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी न्यायाधिकरणासमोर अंतिम सुनावणीकरिता निश्चित करण्यात आली आहे.

कोणीही व्यक्ती प्रस्तावित योजनेच्या संबंधात, जर असल्यास निवेदन करण्यासाठी इच्छुक असल्यास कंपनी याचिकेच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर न्यायाधिकरणाकडे निवेदन पाठवू शकतात. सदर निवेदनाची एक प्रत त्याच वेळी संबंधित याचिकाकर्ता कंपनीकडे पाठवू शकतात आणि शपथपत्राच्या स्वरुपातील अभिवेदनाची पार्श्वभूमी अशा सूचनेसह सादर करणे आवश्यक आहे.

विहित कालावधीत जर कोणत्याही निवेदन प्राप्त न झाल्यास तर प्रस्तावित योजनेवर तुम्हाला कोणत्याही निवेदन नसल्याचे गृहित धरले जाईल.

कंपनी याचिकासह सर्व निशाणीची प्रत कोणाही व्यक्तीला आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित प्रभार प्रदान केल्यावर संबंधित याचिकाकर्त्या कंपन्याद्वारे पुरविण्यात येईल.

**सदर दिनांक २० ऑक्टोबर, २०२५ ठिकाण : मुंबई**
**पहिली याचिकाकर्ता कंपनीकरिता आणि च्या वतीने**
**सही/–**
**पुरावून मुकुंदा मेनन हरी**
**संचालक**
**डीआयएन : ०८२९३०६३**
**दुसरी याचिकाकर्ता कंपनीकरिता आणि च्या वतीने**
**सही/–**
**अ‍ॅनेट होल्टे**
**संचालक**
**डीआयएन : १०४७७५७९**
**मे. ए आर सी एच अँण्ड असोसिएटस्,**
**चार्टर्ड अकाऊंटंस्**
**१८०४, अनमोल प्राईड, एस. व्ही. रोड,गोरेगाव (पश्चिम),**
**मुंबई–४००१०४**
**याचिका कंपन्यांकरिता व्यावसायिक**

# ANAND RATHI SHARE AND STOCK BROKERS LIMITED

Registered Office: Express Zone, A Wing, 10th Floor, Western Express Highway, Goregaon (E), Mumbai - 400 063, Maharashtra
CIN : U67120MH1991PLC064106, Website www.anandrathi.com

## STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED JUNE 30, 2025

In compliance with Regulation 33 and 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), the board of directors of Anand Rathi Share And Stock Brokers Limited (the "Company") at their meeting held on October, 18, 2025 considered, reviewed and approved the unaudited financial results for the quarter ended June 30, 2025 (the "Financial Results").

The said Financial Results, along with the limited review report thereon, submitted by the auditors have been filed with the stock exchanges and are available on the websites of the stock exchanges (i.e. www.bseindia.com and www.nseindia.com) and also on the website of the Company (www.anandrathi.com). The same can also be accessed by scanning the following Quick Response (QR) Code from compatible devices.

**Date** : October 18, 2025
**Place**: Mumbai

**For and behalf of the Board of Directors of**
**Anand Rathi Share And Stock Brokers Limited**

Pradeep Gupta,
Chairman & Managing Director

vedanta transforming for good | power TSPL

## तलवंडी साबो पॉवर लिमिटेड

**सीआयएन : यू४०१०१एमएच२००७पीएलसी४३३५५७**
**नोंदणीकृत कार्यालय : सी–१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू, न्यू लिंक रोड, चाकाला, अंधेरी (पूर्व), चाकाला एमआयडीसी, मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र, भारत**
**दूरध्वनी : +९१ २२ ६६४३ ४५०० । ई–मेल : tspl.secretarial@vedanta.co.in । संकेतस्थळ : www.tsplindia.co/**

## कंपनी योजना अर्ज क्र. सी.ए.(सीएए)/एमबी/२२०/२०२४

**कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींनुसार वेदांता लिमिटेड (''विभाजित कंपनी'') आणि वेदांता अल्युमिनियम मेटल लिमिटेड (''परिणामी कंपनी १'') आणि तलवंडी साबो पॉवर लिमिटेड (''परिणामी कंपनी २'') आणि माल्को एनर्जी लिमिटेड (''परिणामी कंपनी ३'') आणि वेदांता बेस मेटल्स लिमिटेड (''परिणामी कंपनी ४'') आणि वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड (''परिणामी कंपनी ५'') आणि त्यांच्या संबंधित शेअरधारक व धनको यांच्या दरम्यान व्यवस्थेच्या योजना (''मूळ योजना'') च्या संदर्भात.***

*संदर्भीत अर्ज माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठासमोर दाखल केल्यानंतर, विभाजित कंपनी, परिणामी कंपनी ४ व इतर परिणामी कंपन्यांच्या (यानंतर व्याख्यानुसार) संचालक मंडळांनी (यापुढे ''मंडळ'' म्हणून संबोधलेले) अनुक्रमे २० डिसेंबर, २०२४, २३ डिसेंबर, २०२४ व २३ डिसेंबर, २०२४ रोजी त्यांच्या ठरावांद्वारे मूळ योजनेतील भाग 'व्ही' (विभाजन आणि बेस मेटल्स उपक्रमाचे हस्तांतरण) अंमलात न आणण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, विभाजित कंपनी, परिणामी कंपनी ४ आणि इतर परिणामी कंपन्यांच्या मंडळांनी परिणामी कंपनी १, कंपनी २, कंपनी ३ व कंपनी ५ आणि त्यांच्या संबंधित शेअरधारक व धनको यांच्यामध्ये सुधारित व्यवस्थेच्या योजना मंजूर केली आहे (**''योजना''**). त्यानंतर, विभाजित कंपनीला बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड कडून ०३ जून, २०२५ रोजी निरीक्षण पत्रे प्राप्त झाली असून, योजनेबाबत ''कोणतीही प्रतिकूल निरीक्षणे नाहीत'' असे नमूद केले आहे.

**तलवंडी साबो पॉवर लिमिटेड,** ही कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित असून,
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : सी–१०३, अतुल प्रोजेक्ट्स, कॉर्पोरेट अव्हेन्यू, न्यू लिंक रोड, चाकाला, अंधेरी (पूर्व),
चाकाला एमआयडीसी, मुंबई – ४०००९३, महाराष्ट्र, भारत ... अर्जदार कंपनी / परिणामी कंपनी २

**अर्जदार कंपनी / परिणामी कंपनी २ च्या सुरक्षित कर्जदार व असुरक्षित कर्जदारांच्या सभेच्या सूचनेबाबतची जाहिरात आणि सूचना**

सूचना याद्वारे देण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने **(''न्यायाधिकरण'')** १७ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये **(''न्यायाधिकरण आदेश'')** तलवंडी साबो पॉवर लिमिटेड **(''अर्जदार कंपनी / परिणामी कंपनी २'')** च्या सुरक्षित आणि असुरक्षित कर्जदारांच्या सभा घेण्याचे निर्देश दिले आहेत, ज्यामध्ये वेदांता लिमिटेड (''विभाजित कंपनी'') आणि वेदांता अल्युमिनियम मेटल लिमिटेड **(''परिणामी कंपनी १'')** व परिणामी कंपनी २ आणि माल्को एनर्जी लिमिटेड **(''परिणामी कंपनी ३'')** तसेच वेदांता आयर्न अँड स्टील लिमिटेड **(''परिणामी कंपनी ४'')** आणि त्यांच्या संबंधित शेअरधारक व कर्जदार यांच्यातील कंपनी अधिनियम, २०१३ **(''अधिनियम'')** च्या कलम २३० ते २३२ आणि इतर लागू तरतुदींनुसार प्रस्तावित योजना **(''योजना'')** विचारार्थ आणि आवश्यक असल्यास, सुधारणांसह किंवा सुधारणांशिवाय मंजुरीसाठी ठेवण्यात येईल.

न्यायाधिकरण आदेशानुसार व त्यात दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने, तसेच अधिनियमातील लागू तरतुदींचे पालन करून, पुढे असे कळविण्यात येते की परिणामी कंपनी २ च्या सुरक्षित कर्जदार आणि असुरक्षित कर्जदारांच्या सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग **(''व्हीसी'')**/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यम **(''ओएव्हीएम'')** द्वारे पुढीलप्रमाणे घेण्यात येतील :

| अनु. क्र. | सभेचा प्रकार | सभेचा दिवस व दिनांक | सभेची वेळ |
|---|---|---|---|
| १. | सुरक्षित धनको | शुक्रवार, २१ नोव्हेंबर, २०२५ | सकाळी १०:३० वा. (भाप्रवे) |
| २. | असुरक्षित धनको | शुक्रवार, २१ नोव्हेंबर, २०२५ | सकाळी ११:३० वा. (भाप्रवे) |

वरील सभांच्या सूचना आणि संबंधित दस्तऐवज (योजनासह) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे ई–मेलने पाठविण्यात आले आहेत, ज्या सुरक्षित व असुरक्षित धनकोचे ई–मेल पत्ते परिणामी कंपनी २ / डिपॉझिटरीज / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट **(''आरटीए'')** कंपनीचा आरटीए आहे केफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड (पूर्वी केफिन टेक्नॉलॉजिज प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जात होते) **(''केफिन'')** कडे नोंदणीकृत आहेत.

योजना, सूचना आणि स्पष्टीकरणात्मक निवेदन, कंपनी अधिनियम, कलम २३० आणि २३२ तसेच कंपनी (कॉम्प्रोमायजेस, अरेंजमेंट्स अँड अमलगमेशन्स) नियम, २०१६ **(''सीएए नियम'')** यांच्या नियम ६ अंतर्गत आवश्यक तरतुदी व परिशिष्टांसह कंपनीच्या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत: (i) परिणामी कंपनी २ : www.tsplindia.co, (ii) विभाजित कंपनी : www.vedantalimited.com, (iii) नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') : www.evoting.nsdl.com, जी परिणामी कंपनी २ ने सभांसाठी ई–व्होटिंग आणि इतर सुविधा पुरवण्यासाठी नियुक्त केली आहे. सभेदरम्यान निरीक्षणासाठी आवश्यक असलेले सर्व दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून दिले जातील. सुरक्षित / असुरक्षित धनकोना दस्तऐवजांच्या प्रतांची गरज असल्यास, ते ई–मेलद्वारे संपर्क करू शकतात: tspl.secretarial@vedanta.co.in जर कोणाला हवे असल्यास, कंपनी अधिनियमाच्या कलम २३० व २३२ आणि सीएए नियम, २०१६ अंतर्गत संबंधित अटींनुसार, सूचना व संलग्न दस्तऐवजांची हार्डकॉपी मोफत मिळवता येईल. अधिक माहितीसाठी संपर्क: tspl.secretarial@vedanta.co.in

न्यायाधिकरणाने श्री. कुलदीप कुमार करीर यांची परिणामी कंपनी २ च्या सुरक्षित व असुरक्षित कर्जदारांच्या सभांसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच श्री. उपेन्द्र शुक्ला (एफसीएस – सभासद क्र. २७२७, सीओपी क्र. १६५४), प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव यांची वरील सभांचे परीक्षक (स्क्रूटिनायझर) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. वरील नमूद योजना, जर सुरक्षित व असुरक्षित कर्जदारांकडून त्यांच्या संबंधित सभांमध्ये मंजूर झाली, तर ती न्यायाधिकरणाच्या तसेच नियामक किंवा इतर संबंधित प्राधिकरणांच्या आवश्यक मंजुरी, परवानग्या आणि संमतींना अधीन राहील.

वरील सभांना उपस्थित राहण्याचा आणि मतदानाचा अधिकार असलेली व्यक्ती, सभेच्या आधी रिमोट ई–व्होटिंगद्वारे आपले मत नोंदवू शकते किंवा सभेच्या दिवशी दिलेल्या सूचना अनुसरून ई–व्होटिंगद्वारे मतदान करू शकते. कारण सुरक्षित व असुरक्षित कर्जदारांच्या सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/ऑडिओ व्हिज्युअल माध्यम (ओएव्हीएम) द्वारे आयोजित करण्यात येत आहेत, म्हणून प्रत्यक्ष उपस्थितीची आवश्यकता रद्द करण्यात आली आहे. तद्नुसार, कर्जदारांमार्फत प्रॉक्सी नेमण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

सदर सभांसाठी ई–व्होटिंगसाठी कट–ऑफ दिनांक व रिमोट ई–व्होटिंग कालावधीचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत :

| | |
|---|---|
| **सुरक्षित धनकोची सभा** | |
| ई–व्होटिंगसाठी कट–ऑफ दिनांक | सोमवार, ३० जून, २०२५ |
| रिमोट ई–व्होटिंग सुरू होण्याचा दिवस, दिनांक व वेळ | रविवार, १६ नोव्हेंबर, २०२५; स. ९:०० वा. (भाप्रवे) |
| रिमोट ई–व्होटिंग समाप्त होण्याचा दिवस, दिनांक व वेळ | गुरुवार, २० नोव्हेंबर, २०२५; सायं. ५:०० वा. (भाप्रवे) |
| **असुरक्षित धनकोची सभा** | |
| ई–व्होटिंगसाठी कट–ऑफ दिनांक | सोमवार, ३० जून, २०२५ |
| रिमोट ई–व्होटिंग सुरू होण्याचा दिवस, दिनांक व वेळ | रविवार, १६ नोव्हेंबर, २०२५; स. ९:०० वा. (भाप्रवे) |
| रिमोट ई–व्होटिंग समाप्त होण्याचा दिवस, दिनांक व वेळ | गुरुवार, २० नोव्हेंबर, २०२५; सायं. ५:०० वा. (भाप्रवे) |

निर्दिष्ट दिनांक व वेळेनंतर रिमोट ई–व्होटिंग करता येणार नाही आणि त्या कालावधीनंतर एनएसडीएल तर्फे रिमोट ई–व्होटिंग मॉड्यूल तत्काळ निष्क्रिय केले जाईल.

सभेस उपस्थित राहणारे आणि रिमोट ई–व्होटिंग न केलेले सुरक्षित / असुरक्षित धनको संबंधित सूचनांनुसार सभेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान करू शकतात. ज्या धनकोनी आधीच रिमोट ई–व्होटिंगद्वारे मतदान केले आहे, त्यांना सभेला उपस्थित राहण्याचा अधिकार राहील, परंतु ते पुन्हा मतदान करू शकणार नाहीत.

ज्या सुरक्षित धनकोची नाव परिणामी कंपनी २ च्या सुरक्षित कर्जदारांच्या यादीत सोमवार, ३० जून, २०२५ पर्यंत नोंदलेले आहे, त्यालाच सूचनेत नमूद ठरावावर मतदान करण्याचा व सुरक्षित धनकोच्या सभेत सहभागी होण्याचा अधिकार असेल. सुरक्षित धनकोच्या मतदानाचा हक्क हा ३० जून, २०२५ रोजी परिणामी कंपनी २ कडे असलेल्या त्याच्या बाकी रकमेच्या प्रमाणात असेल.

ज्या असुरक्षित धनकोचे नाव परिणामी कंपनी २ च्या असुरक्षित कर्जदारांच्या यादीत सोमवार, ३० जून, २०२५ पर्यंत नोंदलेले आहे, त्यालाच सूचनेत नमूद ठरावावर मतदान करण्याचा व असुरक्षित धनकोच्या सभेत सहभागी होण्याचा अधिकार असेल. असुरक्षित धनकोच्या मतदानाचा हक्क हा ३० जून, २०२५ रोजी परिणामी कंपनी २ कडे असलेल्या त्याच्या बाकी रकमेच्या प्रमाणात असेल.

सुरक्षित धनको आणि असुरक्षित धनको यांना योजना किंवा सभेत विचारार्थ ठेवलेल्या विषयासंबंधी कोणतीही माहिती हवी असल्यास, सुरक्षित व असुरक्षित धनकोनी गुरुवार, १३ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत खालील ई–मेलवर संपर्क साधावा :tspl.secretarial@vedanta.co.in

रिमोट ई–व्होटिंग संदर्भातील चौकशी किंवा तक्रारींसाठी खालील संपर्क तपशील नोंदवावेत :

**सुश्री. पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक**
एनएसडीएल, तिसरा मजला, नमन चेंबर, प्लॉट क्र. सी–३२, जी–ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई – ४०० ०५१, महाराष्ट्र
**ई–मेल आयडी:** evoting@nsdl.com
**संपर्क क्र.:** ०२२ – ४८८६ ७०००
**दिनांक:** २० ऑक्टोबर, २०२५

**सही/–**
**कुलदीप कुमार करीर**
**परिणामी कंपनी २ च्या सुरक्षित व असुरक्षित धनकोच्या सभांसाठी**
**न्यायाधिकरणामार्फत नियुक्त अध्यक्ष**

HDFC BANK
We understand your world

## एचडीएफसी बँक लिमिटेड

सीआयएन : एल६५९२०एमएच१९९४पीएलसी०८०६१८
नोंद. कार्यालय : एचडीएफसी बँक लि., एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई – ४०००१३.
वेबसाईट: https://www.hdfcbank.com, दूर: ०२२–६६५२ १०००, फॅक्स: ०२२–२४९६ ०७३९

### ३० सप्टेंबर, २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष

(रु. कोटीत)

| अ. क्र. | तपशील | अलिप्त | | | एकत्रित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेली तिमाही ३०.०९.२०२५ | संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२५ | संपलेली तिमाही ३०.०९.२०२४ | संपलेली तिमाही ३०.०९.२०२५ | संपलेले अर्ध वर्ष ३०.०९.२०२५ | संपलेली तिमाही ३०.०९.२०२४ |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित |
| १ | परिचालनातून एकूण उत्पन्न | ९१०४०.७२ | १९०२४०.७५ | ८५४९९.६४ | ११८५६०.६३ | २५१६१५.६० | १२१४५६.७४ |
| २ | कालावधीकरिता (कर, अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी) निव्वळ नफा / (तोटा) | २४४२३.०७ | ४५७१५.४० | २२००५.२८ | २५९०५.७९ | ४५९२३.१० | २३१६६.८९ |
| ३ | कालावधीकरिता कर पूर्व (अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींपश्चात) निव्वळ नफा / (तोटा) | २४४२३.०७ | ४५७१५.४० | २२००५.२८ | २५९०५.७९ | ४५९२३.१० | २३१६६.८९ |
| ४ | कालावधीकरिता कर पश्चात (अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) निव्वळ नफा/ (तोटा) | १८६४१.२८ | ३६७९६.४९ | १६८२०.९७ | १९६१०.६७ | ३५८६८.५८ | १७८२५.९१ |
| ५ | समभाग भांडवल | १५३६.३७ | १५३६.३७ | ७६३.०८ | १५३६.३७ | १५३६.३७ | ७६३.०८ |
| ६ | पुनर्मुल्यांकन राखीव वगळून राखीव (मागील लेखावर्षाच्या ताळेबंदानुसार) | ४९६८५४.२१ | ४९६८५४.२१ | ४३६८३३.३९ | ५१७२१८.९८ | ५१७२१८.९८ | ४५२९८२.८४ |
| ७ | प्रती शेअर प्राप्ती रु. (अनन्यसाधारण बाबीं पूर्वी/नंतर) (प्रत्येकी रु. १/– दर्शनी मूल्य) अवार्षिकीकृत | | | | | | |
| | मूलभूत | १२.१४ | २४.०० | ११.०४ | १२.७८ | २३.३९ | ११.७० |
| | सौम्यिकृत | १२.०९ | २३.८८ | १०.९९ | १२.७१ | २३.२७ | ११.६५ |
| ८ | सिक्युरिटीज प्रिमियम अकाऊंट | १३७५१६.१० | १३७५१६.१० | १३१३२६.७३ | | | |
| ९ | नेट वर्थ | ५०७५३६.५५ | ५०७५३६.५५ | ४५०१३६.६८ | | | |
| १० | थकीत रिडिमेबल प्रेफरन्स शेअर्स | – | – | – | | | |
| ११ | कॅपिटल रिडम्प्शन रीझर्व्ह | – | – | – | | | |
| १२ | डेब्ट इक्विटी रेशो | ०.५२ | ०.५२ | ०.९३ | | | |
| १३ | थकीत कर्जे | ५०९५९७.०५ | ५०९५९७.०५ | ५८५५५६.०८ | | | |

**टीप :**
सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्यूलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसमध्ये सादर केलेल्या सप्टेंबर ३०, २०२५ रोजी संपलेली तिमाही आणि अर्ध वार्षिक वित्तीय निष्कर्षाच्या तपशीलवार विवरणाचा उतारा वर देण्यात आला आहे. वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटस् (www.bseindia.com आणि www.nseindia.com) आणि बँकेची वेबसाईट (www.hdfcbank.com) वर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८ ऑक्टोबर, २०२५**

**सही/–**
**सशिधर जगदीशन**
**व्यवस्थापकीय संचालक**

The spirit of Mumbai is now 97 years old!




www.freepressjournal.in